**नि. फौ.ख.क्र.३८८/२०१९**

सरकार वि. प्रमोद शिंदे व इतर

**निशानी क्र.– ६१**

अभियोग पक्षातर्फे **साक्षीदार क्र.१** यांची जबानी

मी शपथेवर सांगते की,

माझे नांव– संतोष रामभाऊ शिंदे

वय – ४६ वर्षे, धंदा – नोकरी,

रा. विठ्ठलवाडी, इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे

**<u>सरतपासणी सरकारी विधीज्ञ श्री. एम. डी. करे यांचे मार्फत</u>**

**१.** मी सर्व आरोपींना ओळखतो. त्यापैकी आरोपी क्र.१ हा चुलत भाऊ आहे. आरोपी क्र.२ व ३ हे आरोपी क्र.१ चे आई–वडील आहेत. घटना दि.२२/०७/२०१८ रोजी रात्रीचे ०८.१५ वाजताचे सुमारास माझ्या राहते घरापासुन २०० मीटरच्या अंतरावर घडली होती. मी आश्रमशाळेतुन घरी जात असताना इंदापूर–अकलुज च्या कच्चा रस्त्यावर आरोपी क्र.१ प्रमोद आरोपी क्र.२ साधु व आरोपी क्र.३ पारुबाई रस्त्याच्या कडेला उभ्या होत्या. त्यावेळी आरोपी क्र.१ मला म्हणाला की, ''संतोष तु थांब मला तुझ्यासोबत बोलायचे आहे.'' त्यावेळी मी थांबलो. त्यावेळी आरोपी क्र.१ च्या हातात कु–हाड होती. आरोपी क्र.१ मला म्हणाला की, त्याला सामाईक पाण्याची पाईपलाईन विकायची आहे. त्यानंतर त्याने त्याच्या हातातील कु–हाड घेवुन माझ्या उजव्या हाताच्या दंडावर माली. त्यामुळे मी मोटारसायकलवरुन खाली पडलो. त्यानंतर आरोपी क्र.१ ने माझ्या डाव्या हातावर कु–हाडीने मारण्याचा प्रयत्न केला असता मी सदरचा वार हुकवला. त्यानंतर त्याने मला शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपी क्र.२ व ३ ने मला शिवीगाळ करुन माझ्या हाताने व लाथाबुक्क्यांनी मला मारहाण केली. मी आरडा–ओरडा केली असता तेथे लोकं जमा झाले. त्यानंतर आरोपी तेथुन पळुन गेले. घटनेच्यावेळी माझ्यासोबत बाळासाहेब जगताप हजर होता. तो मला आश्रमशाळेतुन घरी सोडवायला आला होता. त्याने मला गाडीवर बसवुन इंदापुर येथील डॉ. पाटील यांच्या फ्रॅक्चर दवाखान्यात घेवुन गेला. तेथे डॉक्टरांनी माझ्यावर उपचार केले व माझा उजवा हाताचा एक्से काढला व उजवा हाताच्या दंडावर फ्रॅक्चर असल्याचे मला सांगितले. तेथे मी डॉक्टरांना मला मारहाण झाल्याबाबत सांगितले असता

डॉक्टरांनी पोलीसांना फोन करुन बोलावुन घेतले. त्यानंतर तेथे पोलीस आले व त्यांनी माझा जबाब नोंदवुन घेतला. आता मला दिनांक २२/०८/२०१८ रोजीची मी दिलेली फिर्याद दाखविण्यात आली, त्यावर माझा अंगठा असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **निशाणी क्र.६२** देण्यात येते. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, त्यावेळी त्याचा उजवा हात फ्रॅक्चर असल्याने त्याने जबाबावर अंगठा केला होता. मला ज्या कु–हाडीने मारहाण झाली होती ती मला दाखविल्यास ती मी ओळखु शकतो. आता मला एक कु–हाड दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यास **एमओ क्र.१** देण्यात येतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलट तपास आरोपीं करीता विधीज्ञ श्री. एस.के.पठाण यांच्या मार्फत–</u>**

**५.** हे म्हणणे खरे आहे की, सन २०१८ मध्ये मी माझे आई–वडीलांसोबत एकत्र कुटुंबात राहत होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांचे नाव रामभाऊ तात्याबा शिंदे व आईचे नाव अंजना रामभाऊ शिंदे असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, महादेव लक्ष्मणे ढाके हा माझ्या आत्याचा मुलगा आहे. तो गावातला व नात्यातला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मुकिंदा बळीराम शिंदे हा माझ्या भावकीतला आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्यावेळी मोहन सुभाष देवकर हा माझा ट्रॅक्टर ड्रायव्हर होता. तो माझ्या ओळखीतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गणेश सर्जेराव चंदनशिवे व संजय मनोहर कांबळे हे माझे मित्र आहेत.

**६.** हे म्हणणे खरे आहे की, सन २०१५–१६ मध्ये शेतातील पाईपलाईन एकत्रीत टाकली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी असे ठरले होते की, तीन–तीन दिवस आळीपाळीने पाणी वापरायचे. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर दिड ते दोन वर्ष आम्ही व्यवस्थीत पाणी वापरले. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या आठ ते पंधरा दिवस अगोदर आरोपीची डाळींबची बाग हारवेस्टींगसाठी आली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझे आरोपी क्र.१ सोबत पाणी वापरण्यावरुन वाद सुरु होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी सदर पाईपलाईनचे पाणी मी जास्त वापरत असल्याने आरोपी क्र.१ व माझ्यात वाद होत होते. हे म्हणणे खरे आहे की, तेव्हा मला असे माहित होते की, पाईपलाईनवरुन पालखी महामार्ग जाणार होता. साक्षीदार नंतर सांगतो की, त्याला माहित नव्हते की, ज्या पाईपलाईन धारकाचे

क्षेत्रामधुन महामार्ग जाणार होता त्याला शासनाकडुन मोबदला मिळणार होता.

७. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळापासुन ३० ते ४० फुटाचे अंतरावर अकलुज रहदारीचा महामार्ग आहे. हे म्हणणे खरे आहे की, संध्याकाळी ०८.०० सदर रस्त्यांवरुन लोकांची ये–जा असते. मी आरडा–ओरडा केल्यानंतर तीन लोक घटनास्थळी आले होते. विठ्ठलवाडी ते घटनास्थळाचे अंतर ३.५ चे ४ किमी चे आहे. तेथे पोहण्यासाठी १० मिनिटाचा अवधी लागतो. मी दवाखान्यात पोहल्यानंतर १० ते १५ मिनिटानंतर माझ्यावर उपचार सुरु झाले. मी रात्रीचे ०९.०० वाजता दवाखान्यात पोहचलो होतो. माझ्यावर रात्रीचे ०९.०० ते १०.०० पर्यंतच्या कालावधीत उपचार करण्यात आले. १ ते २ तासानंतर पोलीस दवाखान्यात आले होते. पोलीस आल्यानंतर त्यांनी माझा जबाब नोंदविला व ते लगेच निघुन गेले. मला सदरचा जबाब वाचण्यासाठी दिला होता. मी तो वाचुन पाहिला होता.

८. मी पोलीसांना जबाब देतेवेळेस असे सांगितले होते की, आरोपी क्र.२ व ३ यांनी मला हाताने व लाथांनी मारहाण केले. घटनेच्यावेळी माझ्यासोबत बाळासाहेब जगताप हजर होता. तो मला आश्रमशाळेतुन घरी सोडवायला आला होता. सदर बाब माझी फिर्याद नि.क्र.६२ मध्ये नमुद नाही. ते माझ्या फिर्याद मध्ये का नमुद नाही त्याचे कारण कला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी कच्चा व खडकाळ रोड आहे. आरोपी क्र.१ ने मला कु–हाडने मारल्यानंतर माझ्या हातातुन रक्त आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यावेळी डाव्या हातावरचा वार हुकवला म्हणुन माझ्या डाव्या हातावर कोणताही वार अथवा जखम झाली. हे म्हणणे खरे आहे की, एमओ क्र.१ कु–हाडीवर कोणतीही विशिष्ट खुन नाही. हे म्हणणे खरे नाही की, एमओ क्र.१ कु–हाड मी आरोपीने वापरलेली कु–हाड असे अंदाजे सांगितले आहे.

९. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या गाडीवरुन दगडावर पडल्यामुळे माझ्या उजव्या हाताला मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत माझा पाण्याचा वाद असुन मी खोटी फिर्यादी दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पालखी महामार्ग रस्त्याचा मोबादला मला एकट्याला मिळावा म्हणुन मी आरोपींविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, पाईपलाईन विकण्याच्या कारणावरुन आरोपीने मला कधीही रस्त्यावर

थांबवले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने मला कधीही कु–हाडीने मारहाण केली नाही. तसचे आरोपी क्र.२ व ३ने मला शिवीगाळ व दमदाटी केली नाही. म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास – काहीही नाही.**

| | | |
|---|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत<br>Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI<br>Date: 2026.07.02 17:32:46 +0530<br>न्यायदंडाधीकारी प्र.श्रे.इंदापूर<br>दिनांक – ०२/०७/२०२६ | | समक्ष,<br>Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI<br>Date: 2026.07.02 17:32:41 +0530<br>(एम.एच. फारुकी)<br>न्यायदंडाधीकारी प्र.श्रे. इंदापूर. |